# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 20.03.2024** **वार-बुधवार**

---

1.नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

2.लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबाबतची अधिसूचना आज जारी होणार

3.आगामी निवडणुकांमधे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार हे नांव आणि तुतारी वाजवणारा माणूस हे पक्ष चिन्ह वापरायला शरद पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

4.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयकर विभागाच्या पुणे शाखेचा नियंत्रण कक्ष

5.२००६ मधल्या बनावट चकमक प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाची माजी पोलिस अधिकारी प्रदीप शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा

**सर्वोच्च न्यायालय सीएए**

नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्यास काल सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला. या कायद्याच्या अंमलबजावणीला आव्हान देणाऱ्या २३७ याचिकांना तीन आठवड्यात उत्तर देण्याचे आदेश न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. इंडियन युनियन मुस्लीम लीग, काँग्रेस नेते जयराम रमेश आणि तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोइत्रा यांनी नागरिकत्व सुधारणा कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरील पुढील सुनावणी ९ एप्रिलला होणार आहे.

**राज्यपाल बेलारुस**

बेलारूस भारतासोबत व्यापार, व्यवसाय, पर्यटन आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्यास उत्सुक आहे. या दृष्टीनं बेलारुसमधील ब्रेस्ट प्रांत महाराष्ट्रासोबत सहकार्य करार करण्यास प्रयत्नशील आहे.

अशी माहिती मुंबईतील बेलारुसचे नवनियुक्त वाणिज्यदूत अलियाक्सांद्र मात्सुकोऊ यांनी दिली. बेलारुसनं मुंबईत प्रथमच आपला स्वतंत्र वाणिज्य दूतावास सुरु केला असून पहिले वाणिज्यदूत मात्सुकोऊ यांनी काल राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. नुकतीच नवी दिल्लीत बेलारुसच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. या भेटीत ब्रेस्ट प्रांत – महाराष्ट्र प्रादेशिक सहकार्याबाबत चर्चा झाल्याची माहिती मात्सुकोऊ यांनी दिली. तर महाराष्ट्र आणि बेलारुसमधल्या विद्यापीठांमध्ये शैक्षणिक सहकार्य, विद्यार्थी आणि प्राध्यापक आदान प्रदान तसंच सांस्कृतिक देवाणघेवाण वाढावी अशी अपेक्षा राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली.

**निवडणूक अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबाबतची अधिसूचना आज जारी केली जाणार आहे. या पहिल्या टप्प्यात १७ राज्यं आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ मतदार संघांमध्ये मतदान होणार आहे. यात राज्यातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर या ५ मतदारसंघांचा समावेश आहे. २७ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून २८ तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. या मतदार संघांमध्ये १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**मुख्य निवडणूक आयुक्त**

निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीनं निर्देश दिले आहेत. या निर्देशांचं काटेकोर पालन सर्व संबंधितांकडून केलं जाईल, कुठल्याही प्रकारे पैसे तसंच बळाचा दुरुपयोग निवडणूक प्रक्रियेत होणार नाही, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहावं अशा सूचना राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिल्या आहेत. मंत्रालयात ईएसएमएस ॲप संदर्भात काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यातली सर्व विमानतळं, रेल्वे स्थानकं, बंदरं, सागरी किनारे या ठिकाणी बारकाईनं लक्ष ठेवावं, संशयास्पद बाबी आढळताच कसून तपासणी करावी. वन विभागानंही तपासणी नाके उभारावेत अशा सूचना त्यांनी दिल्या.या बैठकीला अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण कुलकर्णी यांच्यासह सर्व संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**सर्वोच्च न्यायालय राष्ट्रवादी काँग्रेस**

लोकसभा तसंच विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार हे नांव आणि तुतारी वाजवणारा माणूस हे पक्ष चिन्ह वापरायला सर्वोच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. निवडणूक आयोगालाही या नावाला आणि निवडणूक चिन्हाला मान्यता देण्याचे आदेश न्यायालयानं दिले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार आणि अजित पवार गटातल्या वादावर काल सर्वोच्च न्यायालयानं अंतरिम आदेश जारी केला.

दरम्यान, अजित पवार गटानं आपलं घड्याळ हे चिन्ह वापरण्याबाबतचा निर्णय न्यायालयाच्या अधीन असल्याचं निवेदन जारी करावं असं न्यायालयानं सांगितलं आहे.

घड्याळ चिन्ह अजित पवार गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

**पुणे आयकर विभाग**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयकर विभागाच्या पुणे शाखेनं पैशांचा गैरवापर रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. हा कक्ष आठवड्याचे सातही दिवस २४ तास कार्यरत असेल अशी माहिती आयकर विभागानं दिली आहे. या कक्षातील १८००-२३३-०३५३ अथवा १८००-२३३-०३५४ या मोफत दूरध्वनी क्रमांकावर नागरिकांना तक्रार दाखल करता येईल. तसंच ९४ २० २४ ४९ ८४ या व्हॉट्स अप क्रमांकावर देखील तक्रार नोंदवता येईल. या नियंत्रण कक्षात पुण्याबरोबरच पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या तक्रारीही स्वीकारल्या जातील. मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हा नियंत्रण कक्ष सुरु राहणार आहे.

**नियुक्ती-बदली-घाले**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्य सरकारनं काल विविध सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांची मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन व्यवस्थापकीय संचालक म्हणून तर, ठाण्याचे पालिका आयुक्त अभिजित बांगर आणि राज्याच्या जलजीवन मिशनचे अभियान संचालक अमित सैनी यांची मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवी मुंबईचे पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांची बदली सहकार निबंधक आयुक्तपदी करण्यात आली आहे. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुणाल खेमनार यांच्या जागी नागपूर स्मार्ट सिटी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खेमनार आता पुण्याचे साखर आयुक्त म्हणून काम पाहतील.

**मतदार जनजागृती**

मतदार जनजागृती अभियानाच्या अंतर्गत काल कोल्हापूर शहरात १० हजार ४९५ शालेय विद्यार्थ्यांनी मानवी रांगोळी साकारुन मतदानाचा संदेश दिला. शहरातल्या ३८ पेक्षा जास्त शाळांमधले विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.

**<u>मतदान शपथ</u>**

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी पुणे जिल्ह्यात जनजागृती करण्यात येत आहे. त्याअंतर्गत भोसरी विधानसभा मतदार संघात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छता सेवकांना मतदानाची शपथ देण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयातर्फे इंद्रायणीनगर, चिखली, जाधववाडी, अंकुशराव लांडगे सभागृह या परिसरातल्या सुमारे ५०० स्वच्छता सेवकांनी मतदानाची शपथ घेतली.

**<u>महिला मतदार</u>**

रायगड लोकसभा मतदार संघात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या २६ हजार ९ शे एकनं जास्त असल्याची माहिती काल जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

रायगड मतदार संघातील २ हजार १ शे ८५ मतदार केंद्रांपैकी ६ केंद्रं संवेदनशील आहेत असं त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<u>निवडणूक बँक</u>**

लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत सर्व बँकांनी संशयास्पद व्यवहारांवर लक्ष ठेवावं असे निर्देश सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनी बँक अधिकाऱ्यांना एका बैठकीत दिले. संशयास्पद व्यवहारांची माहिती जिल्हास्तरीय खर्च नियंत्रण समितीला दयावी, कोणताही निर्णय बँकांनी त्यांच्या स्तरावर घेऊ नये अशी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केली. निवडणूक खर्चाच्या अनुषंगानं १ लाखापेक्षा जास्त रकमेच्या सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांबाबत जिल्हास्तरीय निवडणूक खर्च नियंत्रण समितीला माहिती द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

**<u>उच्च न्यायालय प्रदीप शर्मा</u>**

मुंबई उच्च न्यायालयानं माजी पोलिस अधिकारी प्रदीप शर्मा यांना २००६ च्या बनावट चकमक प्रकरणी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठानं याप्रकरणी सत्र न्यायालयाचा शर्मा यांना निर्दोष ठरवणारा आदेश रद्द केला. ३ आठवड्यात संबंधित सत्र न्यायालयात हजर होण्याचे आदेश न्यायालयानं प्रदीप शर्मा यांना दिले आहेत. २००६ मध्ये छोटा राजन टोळीचा कथित हस्तक लखन भैय्या पोलिसांशी झालेल्या बनावट चकमकीत मारला गेला होता.

हॉकीचौदाव्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत काल पुण्यात हॉकी मणिपूरनं हॉकी उत्तराखंडवर 11-2 असा सहज पराभव करताना सलग तिसऱ्या विजयासह अंतिम आठ संघांमध्ये धडक मारली. आता बाद फेरीत त्यांची गाठ हॉकी महाराष्ट्रशी पडेल. हॉकी मध्य प्रदेश विरुद्ध पश्चिम बंगाल, हरियाणा विरुद्ध ओडिशा आणि झारखंड विरुद्ध मिझोराम यांच्यात उपांत्य पूर्व फेरीतील सामने आज रंगणार आहेत.

**<u>हवामान</u>**

गडचिरोलीत काल दुपारी पावसानं हजेरी लावली. पुढील चोवीस तासांत विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि वीजांसह पाऊस पडेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.